# महाराष्ट्र शासन
## सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार, औरंगाबाद,
## पैठण रोड, रेल्वे स्टेशनजवळ, औरंगाबाद - ४३१ ००५.
## सरळसेवा भरती गट-ड
## जाहिरात क्रमांक २/२०१३

सहायक संचालक शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार औरंगाबाद या आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील रिक्तपदांच्या भरतीसाठी अर्हततधारक उमेदवाराकडून लेखी व मौखिक मुलाखतीसाठी अर्ज मागविण्यांत येत आहेत. इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्ज दिनांक २०/०१/२०१४ पर्यत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत पोस्टव्दारे अथवा हस्तपोच व्दारे शेवटचा दिनांक व वेळेपुर्वी सादर करावेत.

सरळसेवेची घोषित पदे

| अ.क्र | पदाचे नाव | एकूण पदे | समांतर आरक्षण | अनुसूचित जाती | अनसूचित | वि.जा.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | वि मा. प्र. | इ. मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शिपाई<br>४४४०-७४४०, ग्रेड वेतन-१३०० | २ | - | - | - | १ | - | - | - | - | - | १ |
| २ | मजूर,<br>४४४०-७४४०, ग्रेड वेतन-१३०० | १ | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | १ |

२. शैक्षणिक अर्हता/अनुभव-

२.१. शिपाई पदाकरीता- शैक्षणिक अर्हता शासन मान्य प्राथमिक शाळेची ४थी इयत्ता उत्तीर्ण.

२.२. मजूर पदाकरीता- शैक्षणिक अर्हता शासन मान्य प्राथमिक शाळेची इयत्ता ४थी उत्तीर्ण,अंग मेहनतीचे काम करणा-या सुदृढ प्रकृतीच्या उमेदवारास प्राधान्य.

३. वयोमर्यादा :-

३.१. उमेदवाराचे वय दिनांक ०१-०१-२०१४ रोजी १८ वर्षे पूर्ण, खुल्या प्रवर्गासाठी कमाल ३३ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल ३८ वर्षे असे राहील.

३.२. माजी सैनिकांसाठी सशस्त्र दलात ६ महिने सेवा केलेल्या माजी सैनिकामधील, त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड कालावधी अधिक तीन वर्ष एवढा कालावधी त्यांचा विहित दिमांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल.

३.३. (१) स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशीत पाल्य (२) सन १९९१ चे जनगणना कर्मचारी (३) सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी (४) शासकीय सेवेतील कर्मचारी (५)प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त उमेदवार (६) अंपग उमेदवार इत्यादींसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहतील.

३.४. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षांकरीता शिथिल करता येईल.

३.५. अंशकालीन कर्मचारी उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.

४. इतर महत्वाच्या सूचना :-

४.१ अर्ज सहायक संचालक, लेखनसामग्री व ग्रंथगार औरंगाबाद रेल्वेस्टेशन जवळ पैठण रोड, औरंगाबाद-४३१००५. यापत्त्यावर पाठवावे. पोस्टाने पाठविलेल्या पाकिटावर पदाचा स्पष्ट उल्लेख करावा.

४.२ अर्जासोबत शैक्षणिक अर्हता व इतर अर्हतेविषयी तसेच जात प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात.

४.३ विहित नमुन्यातील अर्ज परिपुर्ण भरलेला असावा, अपुर्ण माहिती व अपुर्ण कागदपत्रे जोडलेला अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल. अपात्र ठरविण्यांत आलेल्या अर्जदारांशी नंतर कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.पात्रताधारक उमेदवारांना लेखी/मौखिक मुलाखतीचा दिनांक, स्थळ व वेळ यथावकाश कळविण्यांत येईल.

४.४ अर्जामध्ये पदाच नांव, स्वत:चे संपूर्ण नांव, पत्ता, जन्मदिनांक, जात-पोटजात, शैक्षणिक अर्हता पुर्व अनुभव असल्यास नमुद करावा. अपुर्ण भरलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवारांनी अर्जावर अलिकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज आकाराचा फोटो जोडून त्यावर स्वाक्षरी करावी, तसेच एक अतिरिक्त फोटो अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४.५ विजा(अ) या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्तीगट (क्रिमीलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारानें दिलेले दिनाक ३१-३-२०१४ अखेर वैध असलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित्त प्रत अर्जासोबत सादर केली तरच त्यांना संबधित आरक्षणाचा लाभ दिल्या जाईल, अन्यथा दिल्या जाणार नाही.

४.६ शासन निर्णय क्रमांक रिपभ/प्र.क्रं.६६/२०११/ई-१०,दि.२७-६-२०११ नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाल्या असल्याचा जन्म दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

४.७ पोस्टाव्दारे विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच टपालाने उशिरा प्राप्त होणा-या अर्जासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

४.८. सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दि.२८-०३-२००५ व शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक ०१-०७-२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये दि.२८-०३-२००५ नुसार रोजी हयात असलेल्या व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या याबाबत लहान कुटूंब असल्याचें विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र, सादर करणे आवश्यक आहे. तसेच, अविवाहित असणा-या उमेदवारानेही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

४.९. शासन निर्णय वित्त विभाग अनियो/१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ अन्वये दिनांक १/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांसाठी नवीन परिभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

४.१०. शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचा अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावेत. सदर परवानगी अर्ज सादर करण्यापुर्वीची असणे आवश्यक आहे.

४.११ निवड प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दबाव आणना-याची उमेदवारी अपात्र ठरवीण्यांत येईल.

४.१२ लेखी परीक्षा व मुलाखतीचे गुणांकन आणि मुलाखतीस व निवडपात्र होण्यांसाठी किमान गुण :-
शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही -२००४/प्र.क्र.१२/०४/बारा,दि.७ जून २००४ व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं - २००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि. १९ ऑक्टोबर २००७ नुसार लेखी परीक्षा व मुलाखतीच्या गुणांकनाचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदनाम | लेखी परीक्षेचे गुण | मुलाखतीचे गुण | एकुण गुण |
|---|---|---|---|---|
| १ | शिपाई | ७५ | २५ | १०० |
| २ | मजूर | ७५ | २५ | १०० |

४.१३ परिक्षाचा निकाल तयार करतांना परिक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक प्रानिम-२००७/प्र.क्रं. ४६/०७/१३-अ, दि.२७-०६-२००८ मधिल निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार प्राधान्य क्रमांच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

४.१४ शिपाई व मजूर पदाकरिता लेखी परिक्षेतील गुणवत्तेनुसार कागदपत्राची तपासणी झाल्यानंतर प्रथम पाच पात्र उमेदवारांची २५ गुणाची मौखिक (मुलाखत) परिक्षा घेण्यांत येईल. लेखी व मौखिक परिक्षेचे गुण एकत्रित करुन गुणानुक्रमानुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल. नमुद केलेल्या पदासाठी असलेल्या मौखिक (मुलाखत) परिक्षेस उमेदवार गैरहजर राहिल्यास उमेदवाराची निवड करता येणार नाही. उमेवारांना लेखी परिक्षेस व मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल, उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे व भत्ता देय राहणार नाही.

४.१५ उमेदवारांला कोणत्याही न्यायालयाने अध:पतन व फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी, न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झाली असल्यास त्याबाबत तपशिल अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

४.१६ सदर जाहिरात ही www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल.

४.१७ भरती प्रक्रिया अंतर्गत कोणत्याही स्तरावर बदल करणे, परिक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार प्र.सहायक संचालक शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार, औरंगाबाद तथा अध्यक्ष गट-ड निवड समिती यांना राहतील. यासंदर्भात कोणासही कोणत्याही स्तरावरुन वाद उपस्थित करता येणार नाही.

५. खालील उणिवा असलेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील. :-

५.१. विहित नमुन्यातील नसलेले अर्ज.

५.२. फोटोवर स्वाक्षरी नसलेले व अर्जावर उमेदवारांची स्वाक्षरी नसलेले अर्ज.

५.३. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज.

५.४. विहित पात्रता पूर्ण न करणा-या उमेदवारांचे अर्ज.

५.५. मजकूर अपूर्ण किंवा चुकीचा भरलेले अर्ज.

५.६. आवश्यक प्रमापत्राच्या प्रमाणित सत्यप्रती न जोडलेले अर्ज.

प्र. सहायक संचालक,
तथा अध्यक्ष निवड समिती गट-ड
शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार, औरंगाबाद.

# अर्जाचा नमुना

| अर्जदाराचा पासपोर्ट आकाराचा अलिकडच्या काळातील काढलेला स्वत:चा फोटो |
|---|
| अर्जदाराची स्वाक्षरी |

प्रति.

सहायक संचालक,

शासकीय लेखनसामग्री व ग्रंथागार,

रेल्वेस्टेशन जवळ, पैठणरोड,

औरंगाबाद-४३१००५.

**विषय : -------------------------- पदासाठीं अर्ज**

**( पदाचा स्पष्ट उल्लेख करावा )**

संदर्भ : ----------------------------

महोदय,

संदर्भीय जाहिरानुसार मी सरळसेवा प्रवेशाने -------------------------- या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता खालीलप्रमाणे विहित नमुन्यात अर्ज सादर करीत आहे.

१. संपूर्ण नांव (आडनांव प्रथम लिहावे) ..............................................................

२. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता ..............................................................

..............................................................

..............................................................

..............................................................

भ्रमणध्वनी क्रमांक [ ] ईमेल आयडी - ..............................................

३. अर्जदाराची जन्मतारीख (अंकामध्ये)

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

०१.०१.२०१४ रोजी उमेदवाराचे वय

| वर्ष | महिने | दिवस. |
|---|---|---|
| | | |

अर्जदाराची जन्मतारीख अक्षरी ..............................................................

४. अर्जदार मागासवर्गीय आहे काय ? होय / नाही [ ]

अ) मागासवर्गीय असल्यास जातीचा उल्लेख करावा [ ]

ब) अर्जदार ज्या प्रवर्गाकरीता अर्ज करीत आहे त्याचा स्पष्ट उल्लेख करावा. [ ]

क) अर्जदार उन्नत व प्रगत गटात मोडत आहे काय ? होय / नाही [ ]

( उमेदवार इमाव, विजाअ, भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या या प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक )

५. अर्जदार महाराष्ट्राचा मूळ रहिवासी (डोमीसाईल) आहे काय ? होय / नाही [ ]
( असल्यास रहिवासी दाखला सोबत जोडावा )

६. राष्ट्रीयत्व ..............................................

७. अर्जदाराची शैक्षणिक अर्हता -

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | शाळा / महाविद्यालय / विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | मिळालेल्या गुणांची टक्केवारी | वर्ग / श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

८. अनुभव असल्यास सविस्तर तपशिल खालील तक्त्यात नमूद करावा.

| अ.क्र. | काम केलेल्या संस्थेचे / कार्यालयाचे नांव | पद | कालावधी ( पासून ते पर्यंत ) | अनुभवाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९. अर्जदाराने नोकरीसाठी सेवायोजन कार्यालयात नांव नोंदणी केली आहे काय ?
असल्यास नोंदणी कार्यालयाचे नांव ............................................ नोंदणी क्रमांक ..................दिनांक ......................

१०. अर्जदार विवाहित आहे काय ? होय / नाही

विवाहित असल्यास हयात मुलांची संख्या

उमेदवाराची स्वाक्षरी

---

## प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणित करतो/करते की, आपले विभागातील ( पदाचे नांव ) .................................... या संवर्गातील पदे भरणे संबंधित राहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच मी असे प्रमाणित करतो की, अर्जामध्ये दिलेली माहिती खरी आहे. त्या पृष्टयर्थ मी प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती सोबत जोडल्या आहेत. तसेच असे प्रमाणित करतो की, वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझी या पदासाठी उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहिल. तसेच नोकरीवर हक्क राहणार नाही याची मला जाणीव आहे. याबाबत निवड समिती / नियुक्ती अधिकारी यांचा निर्णय मला बंधनकारक राहिल व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही किंवा उपस्थित करणार नाही.

(उमेदवाराची स्वाक्षरी व संपूर्ण नांव )

---

**प्रमाणपत्र**

**नमुना अ**

**(नियम ४ पहा )**

मी, श्री. / श्रीमती / कुमारी ..........................................................................................................................
श्री. ......................................................................................................यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी वय ...............................वर्ष,
राहणार ...................................................................................... याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो / करते की,

१. मी .................................................. या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला ................................ (संख्या ) इतकी हयात मुले आहे, त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............................... आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.) जन्म दिनांक .............................

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची स्वाक्षरी

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराचे नांव..........................................